SUPPLEMENT

TO THE

# BOMBAY GOVERNMENT GAZETTE.

Published by Authority.

TUESDAY, 11TH FEBRUARY 1862.

## PROCEEDINGS OF THE LEGISLATIVE DEPARTMENT, BOMBAY.

THE following extract from the Proceedings of the Council of His Excellency the Governor of Bombay assembled for the purpose of making Laws and Regulations, is published for the information of all whom it may concern :—

*Bombay, Saturday, 8th February* 1862.

The Council of the Governor of Bombay for the purpose of making Laws and Regulations met according to adjournment.

*PRESENT:—*

THE HONORABLE MR. REEVES.
THE HONORABLE MR. FRERE.
THE HONORABLE MR. WESTROPP.
THE HONORABLE MR. TRISTRAM.
THE HONORABLE THE NAWAB OF SAVANOOR.
THE HONORABLE MR. RUSTOMJEE JAMSETJEE JEJEEBHOY.
THE HONORABLE MR. JUGGONATH SUNKERSETT.
THE HONORABLE MR. PREMABHAI HEMABHAI,
And the SECRETARY.

The HONORABLE MR. REEVES, being the Senior Ordinary Member present, presided in the absence of the Governor.

Under direction of the President, the Secretary read a letter, No. 214, dated the 13th January last, from the Secretary to the Government of India in the Home Department, in which the Government of India desired that the Rules for admission of Strangers should be passed in accordance with the 37th Section of the Indian Councils Act, and not as separate rules for the purpose.

Further, expressing the great doubt of the Governor General in Council as to whether the revised Rules 11 to 15 provide sufficiently for the full deliberation and discussion on measures such as the Secretary of State contemplates, and such as is essential to good legislation; and whether the incidental allusion to Select Committees in the revised Rules 23 is enough to signify that, as an ordinary, if not an invariable, Rule, Bills will be referred to a Select Committee before they are considered in detail by the Council and passed.

The Honorable Mr. Frere thought this was hardly the time to consider this letter, and that it was matter for his Excellency the Governor, under whose authority the Rules had been made. On reference, however, to the Act of Parliament, the Honorable Member perceived that the Council had power to make alteration in the Rules, subject to the Governor's assent, and withdrew his objection.

The Honorable Mr. Westropp recommended that every Bill should be read a first and second time, and then referred to a Select Committee, and on receipt of their report, read a third time and passed.

The President proposed that the present Rules should be tried, and that on the occurrence of any practical difficulty, the necessary amendments should be recommended to the Governor for his approval.

Mr. Westropp urged that there was still a difficulty, and asked how the Bills now before Council were to be treated.

Mr. Frere suggested that they should be read to-day for the first time.

Mr. Westropp said that he thought the leave of the Council should be asked before any Bill be brought forward.

It was then agreed that the discussion of the letter from the Government of India should stand over for the present, and that the Council should proceed to other business.

The Honorable Mr. Frere observed that there are numerous precedents for bringing lands under Regulations, and proposed (the preamble and) the Bill for subjecting to the Regulations the lands ceded by the Guicowar for the Railway, drawn up in accordance with the usual form.

The Honorable Mr. Westropp said it does not appear to what zillah these lands are to be attached, or what Officers should have jurisdiction over them. If they are not to be formed into a separate zillah, which he presumed the Government do not intend, he considered it would be better to define this point: but he approved of the Bill in other respects.

Mr. Frere would therefore add these words to the Bill, "and to be annexed to the zillah of Surat." The Railway itself would facilitate any prisoners apprehended on the ceded lands being brought to Surat for trial.

Mr. Westropp thought it would be better to let this Bill stand over for further consideration, and that the Honorable proposer should be asked to perfect the Bill before the next Meeting of Council.

The President thought it should be either passed or referred to a Select Committee.

Mr. Frere thought the further consideration of the Bill should be adjourned to the next meeting, when he promised to bring it forward with the requisite amendments.

*Agreed to.*

The Honorable Mr. Reeves said he thought it very desirable that the Bill regarding Juvenile Reformatories should be made over to a Committee for careful examination.

The Honorable Mr. Frere said that this was a very complicated question, as the Bill not only provides for the confinement of Juvenile Offenders, but mulcts the Municipal

Commissioners of Bombay of a part of their revenue. It should therefore be referred to a Select Committee.

The HONORABLE MR. TRISTRAM asked why this Bill should not have general application in the Mofussil, where benevolent individuals might be found ready to found reformatories like the "David Sassoon Institution." He would suggest that a wider scope be given to the Bill.

The HONORABLE Mr. JUGGONATH SUNKERSETT doubted the policy of sending a Juvenile Offender to prison with hard labour when he escaped from the reformatory. Confinement in a Jail would demoralize him, whereas suitable punishment administered within the walls of the reformatory would have a deterrent effect; Magistrates should therefore have discretionary power as to the punishment to be given to those who escape.

The HONORABLE MR. WESTROPP remarked that the HONORABLE MR. TRISTRAM's objection is met by Act XXV. of 1861, Section 433 (Criminal Procedure Act), which is now the law throughout the Mofussil.

The Honorable the PRESIDENT then proposed,—

The Honorable Mr. FRERE,
The Honorable Mr. WESTROPP,
The Honorable Mr. JUGGONATH SUNKERSETT,

and

The Honorable the NAWAB of SAVANOOR, to be a Select Committee to consider this Bill.

*Agreed to.*

The HONORABLE MR. REEVES observed that the remaining Bill is one to provide a remedy for what has been long considered a defect in the Municipal Act.

The HONORABLE MR. WESTROPP remarked that an entirely new principle is introduced, *i. e.* of making Education a charge on Municipal Funds. This he believed to be quite unprecedented, and contrary to the practice in England. It is, indeed, a project to which he would object entirely, were it not for the provision in the Clause of the Bill by which the assent of Government was required to all such disbursements.

The HONORABLE MR. TRISTRAM observed that this Bill would enable the Municipal Commissioners to introduce a series of schools of different religious denominations; he therefore wished that it should be considered in full Council, and that some Rules should be laid down to ensure the due fulfilment of its provisions. He considered that it was necessary that such schools should be open to all classes and all religions, and that they should be under the control of Government Educational Department.

MR. WESTROPP understood that Dispensaries in England were managed by Grand Juries, and not by Municipal Corporations; but he had no objection to the Municipal Funds in India being made available for the support of Dispensaries.

The PRESIDENT thought that as Municipal Commissioners were properly and carefully selected so as to represent different religious, there was no fear of any ill results coming from a preponderance of any one creed; he would, however, propose to nominate the following Select Committee to consider the Bill:—

The Honorable Mr. REEVES.
The Honorable Mr. TRISTRAM.
The Honorable Mr. RUSTOMJEE JAMSETJEE JEJEEBHOY.

and

The Honorable Mr. PREMABHAI HEMABHAI.

*Agreed to.*

With reference to the letter of the Government of India, Mr. Westropp thought it would now be admitted to be advisable that there should be some more precise Rules laid down, so that the Honorable Members might be aware of the stage to which any Bill had advanced.

Mr. Frere would ask Mr. Westropp to bring forward at next meeting any amendments which he may consider to be called for.

Mr. Westropp said that he would agree either to bring it forward himself, or that the Governor should be asked to make such alterations as he may think required.

Mr. Reeves thought the best way would be to consider the subject out of Council, and to settle some amendments at next meeting, which would then be submitted for His Excellency the Governor's assent.

*Agreed to.*

The President adjourned the Council till *Saturday, the 15th*, at 1 p. m.

*By Order of His Excellency the Governor of Bombay in Council,*

M. J. SHAW STEWART,

Acting Secretary to Government.

*Bombay Castle, 8th February* 1862.

कायदे व कानूं करण्यासाठीं बंदेगान आलीनवाब मुस्तताब हजरत आनरबल गवरनर साहेब बाहादूर जंजिरे मुंबई यांचें कौन्सिल भरलें होतें त्यावेळीं काम चाललें त्यांतील खालीं लिहिलेला उतारा सर्वांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला आहे.

सुकाम जंजिरे मुंबई, शनवार तारीख ८ वी माहे फेब्रुआरी सन १८६२.

कायदे व कानूं करण्यासाठीं मुंबईचे गवरनर साहेबांचे कौन्सिलाची सभा आजच्या दिवसापर्यंत तहकूब केली होती त्याप्रमाणें आज पुनः भरली.

## हजर.

आनरबल रीव्ज साहेब.
आनरबल फ्रीयर साहेब.
आनरबल वेस्त्राप साहेब.
आनरबल ट्रिस्ट्रम साहेब.
आनरबल नवाब साहेब सावनूर येथील.
आनरबल रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.
आनरबल जगन्नाथ शंकरशेट साहेब.
आनरबल प्रेमाभाई हेमाभाई साहेब.
आणि सेक्रेटरी साहेब.

कौन्सिलाचे आर्डिनरी मेंबर हजर होते त्यांपैकीं आनरबल रीव्ज साहेब सिनियर असल्यामुळें ते गवरनर साहेब हजर नव्हते सबब प्रेसिडेंट झाले.

प्रेसिडेन्ट साहेबानी फरमाविल्यावरून सेक्रेटरी साहेबानी इंडिया सरकारचें होम डिपार्टमेंटांतील सेक्रेटरी साहेबांकडून आलेलें गेल्या जान्युआरी महिन्याचे १३ वे तारिखेचें २१४ वे नंबराचें पत्र वाचलें त्या पत्रांत इंडिया सरकारानी लिहिलें आहे कीं कौन्सिल भरलें असेल तेथें परके लोकांस येऊं देण्याविषयींच्या कानूं ठरविणें त्या हिंदुस्थानांतील कौन्सिलाचे आक्टाचे ३७ वे कलमा अन्वयें ठरवाव्या व त्या निराळ्याच कानूं ठरवूं नये आणि स्टेट सेक्रेटरी साहेबांचे मनोदयाप्रमाणें व कायदे चांगले होण्यास अवश्य आहे त्याप्रमाणें कायद्याचे मसुद्यान्चा पूर्तेपणीं वादविवाद होऊन विच्यार होण्यासाठीं ११ वे अंकापासून १५ वें अंकापर्यंतचे दुरुस्त केलेले नियमांत पूर्ता बंदोबस्त आहे किंवा नाहीं या विषयीं आणि कायद्याचे मसूद्याचा कौन्सिलाने तपशीलवार विच्यार करून तो मुकरर केल्यापूर्वी तो सिलेक्ट कमिटीकडे बहुतकरून तरी सोंपण्यांत येईल असा अर्थ सुधारलेले २३ वे कानूंत प्रसंगानुरूप सिलेक्ट कमिटीविषयीं मजकूर लिहिला आहे त्या मजकुरावरून होतो किंवा नाहीं या विषयीं गवरनर जनरल साहेब दर इजलास कौन्सिल यांस अंदेशा आहे.

आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले कीं या पत्राचा विच्यार करण्याचा हा वेळ नाहीं. आलीज्या गवरनर साहेबानी नियम ठरविले आहेत तेव्हां या पत्राचा विच्यार करणें त्यांकडे आहे परंतु पार्लमेंट सभेच्या आक्ट पाहिल्यावरून आनरबल फ्रीयर साहेबांचे नजरेस आलें कीं गवरनर साहेबांचे मंजुरीनें नियमांत फेरफार करण्याचा अधिकार कौन्सिलास आहे. या प्रमाणे नजरेस आल्यावरून त्याणी आपली हरकत नाहीं ह्मणून ह्मटलें.

आनरबल् वेस्राप साहेब ह्मणाले कीं प्रत्येक कायद्याचा मसुदा पहिले व दुसरे वेळीं वाचून मग तो सिलेक्ट कमिटी कडे सोंपावा आणि त्या कमिटीचा रिपोर्ट आल्यावर तो मसुदा तिसरे वेळीं वाचून मुकरर करावा.

आनरबल प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं हाल्लींचे नियमां प्रमाणे काम चालवून पाहावें व कामांत हरकत पडली तर जरूर असेल त्या प्रमाणें नियमांत फेरफार करून ते गवरनर साहेबांकडे मंजुरी साठीं पाठवावे.

आनरबल् वेस्राप साहेब ह्मणाले कीं तसें केलें तरी अडचणच आहे. कौन्सिलापुढें हाल्लीं मसुदे आहेत त्यांची कशी व्यवस्था व्हावी.

आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले कीं ते मसुदे आज पहिले वेळीं वाचावे.

आनरबल वेस्राप साहेब ह्मणाले कीं कोणतेही कायद्याचा मसुदा कौन्सिलापुढें आणण्यापूर्वीं तो आणण्याविषयीं कौन्सिलाची परवानगी घेतली पाहिजे.

नंतर असें ठरविलें कीं इंडिया सरकारचे पत्राचा विचार करण्याचें हाल्लीं तहकूब ठेवून दुसरें काम चालवावें.

आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले कीं जमिनींस कायदे लागू करण्याविषयीं मागें पुष्कळ कायदे झाले आहेत त्यांस गायकवाड सरकारानें लोखंडी सडकेसाठीं दिलेले जमिनींस कायदे लागू करण्याविषयीं मामूल नमुन्या प्रमाणें उद्देशाचा व आक्टाचा मसुदा केला आहे त्याचा विचार करावा.

आनरबल् वेस्राप साहेब ह्मणाले कीं या जमिनी कोणते जिल्ह्यांत दाखल केल्या आहेत किंवा त्यांवर कोणते अंमलदारांची हुकुमत चालावयाची हें या मसुद्यांत लिहिलें नाहीं. याचा निराळा जिल्हा करण्याचा सरकारचा इरादा आहे असें वाटत नाहीं आणि निराळा जिल्हा करावयाचा नाहीं तर या जमिनी कोणते जिल्ह्यांत दाखल करावयाच्या किंवा त्यांवर कोणते अंमलदाराची हुकुमत चालावयाची हें त्यांत लिहिलें पाहिजे. बाकीचा मसुदा ठीक आहे.

यावर आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले कीं, "व सुरत जिल्ह्यांत दाखल कराव्या" हे शब्द मसुद्यांत वाढवावे. ते साहेब आणखी ह्मणाले कीं दिलेले जमिनींवर कोणी मनुष्यास कैद केला असतां त्यास इनसाफ होण्यासाठीं सुरतेस आणण्यास लोखंडी सडकेमुळें फार सुलभ पडेल.

आनरबल वेस्राप साहेब म्हणाले कीं या मसुद्याचा आणखी विच्यार करण्यासाठीं हा मसुदा तहकूब ठेवणे योग्य आहे आणि कोन्सिलाची पुनः सभा होई त्या पूर्वीं तो मसुदा नीट करण्याविषयीं आनरबल् फ्रीयर साहेबांस सांगावें.

आनरबल प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं मसुदा आतांच मुकरर करावा किंवा सिलेक्ट कमिटीकडे सोंपावा.

आनरबल फ्रीयर साहेब म्हणाले कीं पुढले सभेंत या मसुद्याचा आणखी विच्यार करावा, मसुद्यांत अवश्य आहे तसा फेरफार करून तो मसुदा त्या सभेंत आम्ही हजर करूं.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

आनरबल् रीव्ह्ज साहेब म्हणाले कीं अल्पवयी अपराध्यांच्या सन्मार्ग प्रवर्तक उद्योग शाळांविषयींचे कायद्याच्या मसुदा बारीक विच्यार होण्यासाठीं कमिटीकडे सोंपणे योग्य आहे.

यावर आनरबल् फ्रीयर साहेब म्हणाले कीं ही बाबद चोटाळ्याची आहे कारण अल्पवयी अपराध्यांस कैद करण्याविषयीं या मसुद्यांत ठरविलें आहे इतकेंच नाहीं परंतु मुंबईचे म्युनिसिपल् कमिशनरांचे उत्पन्नांतून कांहीं भाग घेण्याविषयींही यांत मजकूर आहे. यास्तव हा मसुदा सिलेक्ट कमिटीकडे सोंपला पाहिजे.

आनरबल् ट्रिस्ट्राम साहेब म्हणाले कीं हा मसुदा जिल्ह्यासही लागू होई असा कां करूं नये, दाउद सासून यांचे सन्मार्ग प्रवर्तक उद्योग शाळे सारिख्या शाळा काढण्यास जिल्ह्यांतही परोपकारी गृहस्थ आढळतील त्यास सर्व ठिकाणीं लागू होई असा हा आक्ट करावा.

आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेब ह्मणाले कीं अल्पवयी अपराधी सन्मार्ग प्रवर्तक उद्योग शाळेंतून पळाले असतां त्यांस तुरुंगांत पाठवून त्यांजकडून सक्त मजुरी करविणें हें योग्य वाटत नाहीं, अल्पवयी अपराध्यांस तुरुंगांत कैद ठेवलें असतां त्यांची च्याल बिघडेल शाळांतच योग्य शिक्षा केली असतां त्यांस भीती राहील. याजकरितां जे अल्पवयी अपराधी पळतील त्यांस शिक्षा देण्याची ती आपले नजरेस येईल त्याप्रमाणे देण्याची मुखत्यारी माजिस्ट्रेटांस असावी.

आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं आनरबल् ट्रिस्ट्राम साहेबानी हरकत घेतली आहे ती फौजदारी काम च्यालविण्याचे रीतीविषयीं कायदा ह्मणून सन १८६१ चा २५ वा आक्ट आहे व तो आतां जिल्ह्यांत च्यालू झाला आहे त्याचे ४३३ वे कलमावरून दूर होते.

नंतर आनरबल् प्रेसिडेंट साहेबांनी ह्मटलें कीं सदर्हू कायद्याचे मसुद्याच्या विच्यार करण्यासाठीं सिलेक्ट कमिटी नेमणे तींत खालीं लिहिलेले साहेब असावे ह्मणजे.

आनरबल् फ्रीयर साहेब.<br>
आनरबल् वेस्ट्राप साहेब.<br>
आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेब.<br>
आणि<br>
आनरबल् नवाब साहेब सावनूर येथील.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

नंतर आनरबल् रीव्ह्ज साहेबानी म्हटलें कीं म्युनिसिपल् आक्टांत एक गोष्ट कसी आहे म्हणून पुष्कळ दिवसां पासून म्हणणे आहे ती गोष्ट ठरविण्याविषयीं बाकी राहिलेला तिसरा मसुदा आहे.

यावर आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं शाळांच्या खर्च म्युनिसिपल् फंडांतून ह्मणजे शहर सुधारण्याचे भांडवलांतून घ्यावा हा अगदीं नवीन ठराव आहे. असें मागें झाल्याच्या दाखला नाहीं व ही गोष्ट इंग्लंड देशांतील रीतीस उलट आहे. शाळांकडे खर्च करणे तो सरकार मंजुरीने केला पाहिजे ह्मणून मसुद्यांत ठराव आहे तो नसता तर हा मसुदा सर्व प्रकारें हरकतीच्या होता.

आनरबल् ट्रिस्ट्राम साहेब ह्मणाले कीं या मसुद्यावरून निरनिराळे धर्माच्या शाळा स्थापण्याचा अधिकार म्युनिसिपल् कमिशनरांस मिळेल याजकरितां या मसुद्याचा विच्यार भर कौन्सिलांत केला पाहिजे व त्यांतील ठरावाप्रमाणे योग्य रितीने वहिवाट होण्याविषयीं कांहीं नियम ठरविले पाहिजेत आणि या शाळांत सर्व ज्ञातींचीं व सर्व धर्मांचीं मुलें घेण्यास हरकत नसावी. व त्या शाळा सरकारी विद्याखात्याचे ताब्यांत असाव्या.

मग आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं इग्लंड देशांत दवाखान्याचा बंदोबस्त ग्र्यांड जुरीकडे असतो म्युनिसिपल् कार्पोरेशनाकडे नसतो तथापि हिंदुस्थानांत शहर सुधारण्याचे भांडवलांतून दवाखान्यांचा खर्च देण्याविषयींचे ठरावास आमचे मतें हरकत नाहीं.

नंतर आनरबल् प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं निरनिराळे धर्मांचे लोकांपैकीं म्युनिसिपल् कमिशनरांची योजना योग्य रितीने व बारीक विच्याराने करण्यांत येते यास्तव हर कोणते धर्मांचे लोक सदर्हू प्रकारचे मंडळींत ज्यास्ती होऊन वाईट परिणाम होतील अशी भीति नाहीं आणि या आक्टाचे मसुद्याचा विच्यार करण्यासाठीं खालीं लिहिल्या प्रमाणे सिलेक्ट कमिटी नेमावी.

आनरबल् रीव्ह्ज साहेब.  
आनरबल् ट्रिस्ट्राम साहेब.  
आनरबल् रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.  
आनरबल् शेट प्रेमाभाई हेमाभाई.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

मग इंडिया सरकारचे सदर्हू पत्राबाबद आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं कोणतेही आक्टाचे मसुद्याचें काम कोठवर आलें आहे हें आनरबल् मेंबरांस समजण्यासाठीं हाल्लींचे नियमांहून अधिक स्पष्ट नियम करविणे योग्य आहे ही गोष्ट आतां सर्व कबूल करितील.

आनरबल् फ्रीयर साहेबांनीं ह्मटलें कीं आनरबल् वेस्ट्राप साहेबांस नियमांत जे फेरफार करणें अवश्य वाटतील ते पुढले सभेस करून आणण्याविषयीं त्यांस सांगावें.

यावर आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं फेरफार करून आणण्यास आह्मी कबूल आहों किंवा गवरनर साहेबांस योग्य वाटेल त्या प्रमाणे फेरफार करण्यास त्यांस लिहून पाठवावें.

आनरबल् रीव्ह्ज साहेब ह्मणाले कीं या प्रकरणाचा विच्यार कौन्सिला बाहेर करून फेरफार करावयाचा तो पुढले सभेस ठरवून मंजूर होण्यासाठीं आलीज्या गवरनर साहेबांकडे पाठवावा.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

नंतर तारीख १५ शनवारचे बारांवर एक वाजेपर्यंत कौन्सिल तहकूब ह्मणून आनरबल् प्रेसिडेंट साहेबानी ठरविलें.

बमुजिब हुकूम बंदीगान आलीन बाब मुस्तताब हजरत आनरबल् गवरनर साहेब बाहादूर दरइजलास कौन्सिल—

मुक्काम जंजिरे मुंबई.  
तारीख ८ वी माहे फेब्रुआरी सन १८६२.

मैक्येल ज्यान शा स्ट्युवर्ट साहेब.  
आक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार यांची सही.

(True translation)  
VENAYEK WASSOODEW,  
Oriental Translator to Govt.